आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

मंगळवार दिनांक २० जानेवारी २०२६

ठळक बातम्या

- दावोस आर्थिक परिषदेत पहिल्याच दिवशी महाराष्ट्राचे विविध कंपन्याबरोबर साडेचौदा लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार.
- नितीन नबीन यांनी भारतीय जनता पार्टीचे १२ वे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून स्वीकारला पदभार.
- भारत आणि न्यूझीलंड क्रिकेट संघांदरम्यान टी-ट्वेंटी सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना उद्या नागपूरच्या जामठा स्टेडीयमवर, यंत्रणा सज्ज.
- 'महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार' जाहीर; देश-विदेशातील संस्कृत विद्वानांचा सन्मान.

<u>दावोस</u>

स्वित्झर्लंड इथं आयोजित जागतिक आर्थिक परिषदेत, कालच्या पहिल्याच दिवशी, महाराष्ट्र राज्य सरकारनं विविध कंपन्याबरोबर विक्रमी, साडेचौदा लाख कोटी रुपयांच्या, गुंतवणूक करारांवर, स्वाक्ऱ्या केल्या. याअंतर्गत स्वाक्षरी केलेल्या १९ सामंजस्य करारांमुळे, विविध क्षेत्रांमध्ये १५ लाखांहून अधक रोजगाराच्या संधी निर्माण होण्याचा अंदाज आहे. हे करार राज्याच्या विकसित महाराष्ट्र-२०४७: व्हिजन आणि पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या महत्त्वाकांक्षी ध्येयाशी सुसंगत असल्याचं राज्य सरकारच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे. महाराष्ट्र भारतातली गुंतवणुकीसाठी, सर्वात चांगली जागा असल्याचं, मुख्यमंत्र्यांनी परिषदेत सांगितल

यावेळी राज्य शासनानं नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात, योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि. यांच्याबरोबर, चार हजार कोटी रुपयांचा, लोढा डेव्हलपर्स लिमिटेड बरोबर, एक लाख कोटी रुपयांचा, अन्न आणि कृषी क्षेत्रात कार्ल्सबर्ग यांच्याबरोबर, ५०० कोटी रुपयांचा, विदर्भामधे पोलाद क्षेत्रात सुरजागड इस्पात लिमिटेडबरोबर २० हजार कोटी रुपयांचा तर लॉजिस्टिक्स क्षेत्रात, एम.एम.आर.डी.ए.आणि एस.बी.जी.ग्रुप

यांच्यात, २० अब्ज डॉलर्सचा, करार करण्यात आला.आगामी दोन दिवसात दावोसमध्ये, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कंम्प्युटींग, डीजिटल सोयीसुविधा, फिनटेक, लॉजिस्टिक्स अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर तसंच जहाज बांधणी, ईव्ही, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील, आणखी काही उद्योग घटकांशीही, गुंतवणुकीचे सामंजस्य करार होणार आहेत. त्यादृष्टीनं त्यांच्या प्रतिनिधींशी, चर्चेच्या फेऱ्या सुरू आहेत.

<u>नितीन नबीन</u>

भारतीय जनता पक्षाचे, बारावे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून, नितीन नबीन यांच्या नावाची औपचारिक घोषणा आज, नवी दिल्लीच्या भाजप मुख्यालयात, पक्षाचे निवडणूक निर्णय अधिकारी, डॉ.के.लक्ष्मण यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते, नवीन यांचा सत्कार करण्यात आला. केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, नितीन गडकरी, माजी अध्यक्ष, जे.पी.नड्डा यावेळी उपस्थिते होते.नितीन नबीन हे बिहार विधानसभेवर पाच वेळा निवडून आलेत. तसंच, बिहार सरकारमध्ये ते गृहनिर्माण आणि कायदामंत्री होते. सिक्कीम आणि छत्तीसगड सारख्या राज्यांमध्येही त्यांनी, महत्त्वाच्या संघटनात्मक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.नितीन नबीन हे भाजपाचे आतापर्यंतचे सर्वात तरुण अध्यक्ष ठरले आहेत. जगातल्या सर्वात मोठ्या राजकीय पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते, नरेंद्र मोदी यांनी नितीन नबीन यांचं अभिनंदन केलं. नितीन नबीन यांच्यावर, केवळ पक्षाचीच नाही तर, रालोआमधे, समन्वय साधण्याची जबाबदारी आहे असं, मोदी म्हणाले....

<u>*मैं आजकल के युवाओं की भाषा में कहूं तो नितिन नबीन खुद भी एक प्रकार से मिलेनियल हैं। वो उस जनरेशन से हैं, जिसने भारत में बड़े आर्थिक, सामाजिक और टेक्नोलॉजिकल परिवर्तन होते देखे हैं। वो उस जनरेशन से हैं, जिसने बचपन में रेडियो से सूचनाएं पाई और आज एआई के भी एक्टिव यूजर है।*</u>

माजी राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांनीही नितीन नबीन यांचं अभिनंदन केलं. नबीन यांच्या नेतृत्वात, भाजपा प्रगती करेल असा विश्वास, त्यांनी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही, नितीन नबीन यांचं अभिनंदन, केलं आहे.

कुपोषण

राज्यातल्या आदिवासी भागात, कुपोषणामुळे अर्भक आणि गर्भवती महिलांचे मृत्यू रोखण्यात अपयश आल्याचं सांगत, मुंबई उच्च न्यायालयानं काल, पुन्हा राज्य सरकारला फटकारलं. मेळघाट परिसरात गर्भवती, स्तनदा माता आणि बालकांच्या मृत्यू प्रकरणी, दाखल याचिकांवर, न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठासमोर, सुनावणी झाली. सरकारनं या समस्येचं निराकरण करण्याची इच्छाशक्ती दाखवायला हवी असं, खंडपीठाने म्हटलं आहे. हे मृत्यू रोखण्यासाठी, सरकारचे प्रयत्न अपुरे असून, या भागात किमान आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असंही, न्यायालयानं सांगितलं.

विजय वडेट्टीवार

चंद्रपूर मनपात, काँग्रेसचाच महापौर बसेल असा ठाम विश्वास, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी नागपुरात माध्यमांसोबत बोलताना व्यक्त केला. काँग्रेसचे 27 नगरसेवक एकत्र असून, आवश्यक संख्याबळ आमच्याकडे आहे असं, त्यांनी सांगितलं. नगरसेवक फोडाफोडीचे आरोप, फेटाळून लावत, सत्ता स्थापने वेळी, सर्वजण एकत्र राहतील, असा दावा त्यांनी केला.

चर्चासत्र

महाराष्ट्रातील संत परंपरेचे जाती निर्मूलनातील योगदान उलगडण्यासाठी नागपूर इथं २३ आणि २४ जानेवारी रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ.आंबेडकर फाउंडेशनच्या सहकार्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासनतर्फे हे चर्चासत्र होणार आहे.कुलगुरू डॉ.मनाली क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली, उद्घाटन होणार असून, डॉ.दिलीप धोंडगे यांचं, बीजभाषण होईल. संत परंपरा, सामाजिक समता आणि आंबेडकरी विचारधारेच्या संदर्भात सखोल वैचारिक मंथन या चर्चासत्रात केले जाणार आहे.

क्रिकेट मॅच

नागपूरच्या जामठा इथल्या, विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर, भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील, पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील, पहिला सामना उद्या खेळला जाणार आहे. एकदिवसीय मालिकेतील, पराभवानंतर कर्णधार, सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली, टीम इंडिया टी-२० मालिकेत, पुनरागमन करण्याच्या

तयारीत आहे. टी-२० विश्वचषक-२०२६ पूर्वीची ही, दोन्ही संघांसाठी महत्त्वाची कसोटी मानली जात आहे.भारतीय संघात संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा सलामीला उतरण्याची शक्यता असून, गोलंदाजीत जसप्रीत बुमराह आणि अर्शदीप सिंग यांच्याकडे लक्ष असेल. जामठा येथील खेळपट्टी फिरकी गोलंदाजांना अनुकूल मानली जाते. भारत-न्यूझीलंड यांच्यात, इथं होणारा हा पहिला, द्विपक्षीय टी-२० सामना ठरणार आहे. या सामन्यासाठी हजारो प्रेक्षक येण्याची शक्यता लक्षात घेता, नागपूर शहर पोलिसांनी, वाहतुकीचे नियोजन केले आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी, प्रेक्षकांनी जास्तीत जास्त, मेट्रोचा वापर करावा असं आवाहन, डी.सी.पी. मतानी यांनी केलं आहे. मेट्रो स्टेशनपासून स्टेडियमपर्यंत, फीडर बसची मोफत सुविधा, देण्यात येणार आहे. ट्राफिक नियोजनाबाबत, अधिक माहिती दिली आहे, डी.सी.पी.ट्राफिक, लोहित मातानी यांनी ----

<u>*इथल्या कम्युटर्सला आम्ही असं आवाहन करतो की संध्याकाळी पाच ते सात वाजेपर्यंत आणि जे मॅच संपल्यानंतर दहा ते साडे अकरा वाजेपर्यंत काही कंजेशन होऊ शकतात. कारण की मॅच चालू होण्याच्या आणि संपल्याच्या वेळ आहे तर तुम्ही जर शक्य असेल तर या रूटला संध्याकाळी पाच ते सात आणि रात्री दहा ते साडे अकरा पर्यंत तुम्ही अवॉइड करा. शहरामध्ये काही प्रॉब्लेम नाहीये. त्या दिवशी ते जे मेन जो इश्यू होणार आहे ते या स्टेज मध्ये होणार आहे. खापरीपासून ते जामठा पर्यंत.*</u>

<u>सायना नेहवाल निवृत्ती</u>

ऑलिंपिक पदक विजेती सायना नेहवालने बॅडमिंटनमधून निवृत्ती जाहीर केली आहे. गुडघ्याच्या दुखापतीमुळे गेली दोन वर्ष सायना खेळापासून दूर होती. मात्र आता दुखणं बळावल्यामुळे आपण खेळणं थांबवत असल्याचं तिने एका पॉडकास्टच्या माध्यमातून जाहीर केलं. जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान मिळवणारी ऑलिंपिक पदक जिंकणारी ती पहिली महिला भारतीय बॅडमिंटनपटू आहे.

<u>राष्ट्रीय पुरस्कार</u>

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातर्फे, दिले जाणारे, ‘महाकवी कालिदास, संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार’ जाहीर करण्यात आले आहेत. आंतरराष्ट्रीय संस्कृत विद्वान् संवर्गात, प्रा.सरोजा भाटे-पुणे आणि प्रा.माधव

देशपांडे-कॅलिफोर्निया यांची निवड झाली आहे. ज्येष्ठ संस्कृत विद्वान् संवर्गात, २०२४ साठी प्रा.कालुरी हनुमंत राव आणि २०२५ साठी, प्रा.कृष्णकांत शर्मा यांना, गौरविण्यात येणार आहे.युवा संस्कृत विद्वान् संवर्गात, २०२४ साठी प्रा.वीरनारायण पांडुरंगी आणि २०२५ साठी, डॉ.सचिन कठाळे यांची निवड करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय आणि ज्येष्ठ विद्वानांना, प्रत्येकी ५० हजार तर, युवा विद्वानांना, २५ हजार रुपये रोख सन्मान देण्यात येणार आहे.कुलगुरू डॉ.अतुल वैद्य आणि कुलसचिव डॉ.रोशन अलोणे यांनी पुरस्कारार्थींचे अभिनंदन केले.

हवामान

आज विदर्भात यवतमाळ इथं, ११ अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. नागपुरात आज १५ अंश सेल्सियस इतकं तापमान आहे.

******